# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ३४५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–२१/०६/२०१६.

**१) शुल्लक कारणावरून मारहान करून जखमी केले. :–**

दिनांक २०/०६/२०१६ रोजी १२.०० वा. दरम्यान फिर्यादी काशिराम सिताराम कामथे वय ३४ वर्ष, रा. मुरमाडी/सावरी यांनी आरोपीला ''बाजुला हो.'' असे म्हटले, यावरून आरोपीने फिर्यादीला ''मला बाजुला का हो'' म्हणाला असे म्हणुन भांडण करून फिर्यादीच्या तोंडावर बुक्की मारून फिर्यादीच्या तोंडाच्या वरील जबडयाच्या समोरील १ दात पाडुन फिर्यादीला जखमी केले. असे फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२५ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. कोसरे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) लोखंडी सलाखीने डोक्यावर मारून जबर दुखापत केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १८/०६/०१६ रोजी १६.०० ते १६.१५ वा. दरम्यान आरोपी व मधुकर देवाजी नेवारे वय ३४ वर्ष, रा. उमरी यांचे घराच्या हिस्से वाटण्या वरून भांडण झाले. आरोपीने मधुकर नेवारे यांना शिवीगाळ करून त्यांच्या डोक्यावर लोखंडी सलाखीने मारून जबर दुखापत केली. दि. २०/०६/२०१६ ला जखमीचे व त्यांच्या पत्नीचे बयान डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२६,५०४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची धडक, इसम जखमी. :–**

दिनांक २०/०६/०१६ रोजी २०.३० ते २१.०० वा. दरम्यान फिर्यादी संदिप निलकंठ भांडारकर वय ३८ वर्ष, रा. शनिवारी वार्ड पवनी हे त्यांच्या मोबाईलवर रिचार्ज करण्यासाठी गेले होते. दुकानातुन घरी परत जात असतांना मोटार सायकल क्र. एमएच ३६ टी ५४८८ च्या आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीला गांधी चौक पवनी येथे धडक मारून जखमी केले. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा यांची कारवाई. :–**

दिनांक २०/०६/०१६ रोजी ०९.३५ वा. दरम्यान आरोपी क्र. १ व २ यांनी आपल्या पदाचा स्वत:च्या आर्थीक लाभाकरिता वाम व भ्रष्ट मार्गाचा गैरवापर करुन तक्रारदार हयांना त्यांचे जुन २०१२ पासुन ते २०१५ पर्यंत वेतन पथक जि.प. भंडारा यांचेकडुन २० टक्के थकबाकी वेतन वाढीची रक्कम १,७३,७५२/–रू. त्यांच्या बॅक खात्यात जमा झाल्याने त्याचा मोबदला म्हणुन १,००,०००/–रु. ची मागणी करून तडजोडी नंतर ८०,०००/–रु. आरोपी क्र. ३ यांच्या मार्फतीने स्विकारले. असे सर तर्फे फिर्यादि श्री. सावरकर उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा यांचे रिपोर्ट वरून

पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ७,१२,१३(१)(ड),१३(२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास श्री. सावरकर उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा हे करीत आहेत.

**(के.एच.धात्रक)**
**प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०**

O/C
APF

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.